**गालिचा रांगोळी स्पर्धा**

शाही दसरा  कोल्हापूरचा २०२३

दिनांक : २२ ऑक्टोबर, २०२३
वेळ : दुपारी २.०० ते सायं. ६.००

कोल्हापुरातील नवरात्र उत्सवाच्या दरम्यान अष्टमी दिवशी ( दिंनाक २२ ऑक्टोंबर २०२३) श्री महालक्ष्मी - अंबाबाई देवीची नगर प्रदक्षिणा असते. गेली अनेक वर्षे या प्रदक्षिणा मार्गावर नागरिक सवय:प्रेरणेने रांगोळ्या काढून व फुलांची आकर्षक सजावट करून मार्ग सुशोभित करतात. भाविक व पर्यटकांच्या दृष्टीने ही पर्वणी ठरते. यामधील अनेक संयोजक व कलाकार हे सेवा म्हणून यामध्ये सहभागी होतात. कोल्हापूरचा शाही दसरा  महोत्सव हा अधिक व्यापक व्हावा आणि या परंपरेला आणखी भव्यता यावी यासाठी या मार्गावरील गालिचा रांगोळी साठी स्पर्धेचे आयोजन प्रतिवर्षी शाही दसरा महोत्सव दरम्यान करण्यात येत आहे.

**स्पर्धेचे नियम व अटी :**

१. संयोजकांनी निश्चित केलेल्या प्रदक्षिणा मार्गावर रस्त्याच्या मध्यभागी सहा फूट रुंद आणि किमान बारा फूट लांबीची गालिचा रांगोळी काढावयाची आहे. अधिक लांबीचा रस्त्याचा भाग सुद्धा विनंतीनुसार उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न करण्यात येईल.
२. रांगोळी संस्कार भारती प्रकारात काढताना त्याच प्रकारचे केवळ रंग व रांगोळी चा वापर करावयाचा आहे. फुले व पाकळ्यांचाहि वापर करता येईल. अन्य वस्तू, मूर्ती बाबींचा वापर करावयाचा नाही.
३. यासाठी व्यक्ती किंवा समूह सहभागी होवू शकतो. मात्र त्यांची संख्या ६ पेक्षा अधिक असू नये.
४. सर्व सहभागी स्पर्धकांना व सेवा वृत्तीने रांगोळी काढणाऱ्या व्यक्ती, संस्था यांना सहभाग प्रमाणपत्र देण्यात येईल. यासाठी सर्वांनी मोफत नोंदणी करून घ्यावी. नोंदणी करताना आपल्या पथकाने या आधी या आकाराच्या काढलेल्या किमान पाच सर्वोत्कृष्ट रांगोळ्यांचे फोटोसुद्धा अपलोड करावे. (सदर बाबीतून अनेक वर्षापासून प्रदक्षिणा मार्गावर ज्या संस्था या उपक्रमात सहभागी होत आहेत त्यांना सूट असेल) .

५. रांगोळी व इतर लागणारे साहित्य स्वखर्चाने आणावयाचे आहे.

६. रांगोळी काम सुरु करण्यापूर्वी आपल्या डिझाईन निवड समिती कडून आपल्या सोई प्रमाणे मंजूर करून घ्यावी.

७. रांगोळी काढण्याचे काम त्याच दिवशी दुपारी दोन ते सायंकाळी सहा पर्यंत पूर्ण करावयाचे आहे. त्यानंतर परीक्षण करण्यात येईल. गुणांकन प्रामुख्याने सौंदर्य, कला, आशय, कल्पकता, इ. बाबींवर आधीर्त असेल .

८. स्पर्धेत प्रथम रु. २५,०००/- ,द्वितीय रु. १५,०००/- व तृतीय रु. १०,०००/- पारितोषिक आणि सहभागी संख्या विचारात घेऊन उत्तेजनार्थ रु. ५,०००/- पारितोषिक दिली जातील.

९. स्पर्धा परीक्षकांचा निर्णय अंतिम राहील.

१०. दिनांक १४ ऑक्टोंबर २०२३ पूर्वी स्पर्धक व सेवा वृत्तीने रांगोळी काढणाऱ्यानी आपली नावे नोंदणी https://kolhapur.gov.in या संकेतस्थळावर करावयाची आहे. त्यानंतर आलेल्या नोंदणी साठी स्पर्धेचे जागे अभावी सहभागी करून घेणे शक्य होणार नाही तरीही सहभागी करून घेण्याचा पूर्ण प्रयत्न करण्यात येईल.

नवरात्र उत्सव आनंददायी ,भावपूर्ण व कला विष्काराना संधी देणारा व्हावा यासाठी मोठ्या संख्येने भक्तांनी व स्पर्धकांनी सहभागी व्हावे असे आवाहन करण्यात आले आहे.

दिनांक २४ ऑक्टोबर २०२३ रोजी संयोजकांमार्फत निकाल जाहीर केला जाईल, स्पर्धेच्या संपूर्ण प्रकीयेमध्ये निवड समितीचा निर्णय अंतिम राहील, या निवड समितीची निवड जिल्हाधिकारी कार्यालय, कोल्हापूर येथील दसरा महोत्सव ट्रस्ट मार्फत करण्यात येईल.

अधिक माहितीसाठी संपर्क
कविता बंकापुरे
८६०५४००७४६ / ८६२३८४८२९३
प्रशांत इंचनाळकर
९८५०८१४१४०